प्रकरण ३ रे

# ''वैदु - एक आदिम जमात''

## प्रकरण ३ रे.

## वैदू - एक आदिम जमात

प्राचीन काळापासून भटके जीवन जगणारी ' वैदू ' ही एक भटकी जमात आहे[1].. या जमातीचा प्रमुख व्यवसाय हा झाडपाल्याची औषधे व झाडाच्या मुळया निरनिराळया आजारांवर लोकांना देणे असा आहे. ही औषधे झोळीमध्ये घेऊन व झोळी बांबूच्या काठीला लावून वैदू सतत एका गावावरून दुस-या गावी फिरत असत.[2] दमा, वाई, वात, उष्णता, लघवीचा त्रास, पायदुखी, गुडगेदुखी, त्वचेचे रोग, गंडमाळ, काविळ इत्यादि रोगांवर नाडीपरीक्षा करून वैदू औषधे देतात.[3] तर वैदू स्त्रिया दातवण, कुंकू, फणी, मणी, काळीपोत इ. वस्तू विकण्याचा उद्योग करतात. ' वैद्य ' म्हणजे औषध देणारा - या शब्दावरूनच वैदू हा शब्द पडला व या जमातीची ओळख वैदू म्हणून होऊ लागली. 1901 च्या मुंबई इलाख्याच्या शिरगणती रिपोर्टनुसार वैदूंची मुंबई इलाख्यातील संख्या 1,103 इतकी दिली होती. त्यामध्ये 586 पुरूष व 517 स्त्रिया आहेत अशी नोंद आहे.[3] यातील निम्मी संख्या पुणे जिल्हयातील आहे तर बाकीची खानदेश, नाशिक व अहमदनगर जिल्हयातील आहे. ही पूर्ण भटकी जमात असल्यामुळे या जमातीची नक्की संख्या शिरगणती करणा-या अधिका-यांना मिळालेली दिसत नाही. वैदू दिसायला उंच, धिप्पाड परंतु रंगाने काळे आहेत. यांच्या स्त्रियाही कर्नाटकातील वडर, कोरवा, धनगर जातीमधील स्त्रियाप्रमाणे दिसतात. सर्वसाधारणपणे हे लोक काळया वर्णाचे आहेत. यांची बोलीभाषा तेलगू आहे. आणि ते स्वतःला हैद्राबादवरून इकडे आलो असे सांगतात[4]. या वरून वैदू जमातीचे मूळ वसतीस्थान हे आंध्र प्रदेश असावे असे नक्की सांगता येते. त्यांच्या निरनिराळया प्रांतातील भटकंतीमुळे त्यांच्या भाषेमध्ये कन्नड व मराठी शब्द समाविष्ट झाले आहेत.

### ( अ ) वैदू - एक आदिम जमात ...

एकंदरित या जमातीबद्दल उपलब्ध असणा-या माहितीवरून व या जमातीमधील आज प्रचलित असलेल्या काही रूढी व आख्यायिकांवरून ही जमात प्राचीन काळापासून भटकंतीचे जीवन जगत आहे असे म्हणण्यास आधार सापडतो. सातारा येथील सायबू गुराप्पा वैदू याने वैदू जमात कशी निर्माण झाली या बद्दलची प्रचलित असलेली आख्यायिका सांगितली ती पुढीलप्रमाणे....

ज्यावेळी पृथ्वीवर फक्त पाणीच होते, जमीन नव्हती तेव्हा आदिपुरूष जामऋषी होता. त्याने पाण्यावर रहाण्यासाठी लव्हाळयाचा पाळणा केला. यावेळी सामर्थ्याने जाम ऋषीला तीन मुले झाली. त्यांची नावे .. रक्तमुनी, यपमुनी आणि दूधमुनी. यातील दूधमुनीला कापले तेव्हां पाण्याचे दूध झाले. रक्तमुनीला कापले तेव्हां रक्त झाले. व यप मुनीला कापल्यावर जमीन निर्माण झाली. यावेळी अंजना देवीच्या अंगावर ' इश्विष्ण ' या देवाच्या लघवीचे सात थेंब पडले व अंजना

देवीस सात मुले झाली. या सात मुलांचा ताडाच्या पानापासून पाळणा तयार करून जाम ऋषीने सांभाळ केला व ही मुले मोठी केली. ही सात मुले म्हणजे वैदू, कोल्हाटी, वडार, कैकाडी, धनगर, ब्राम्हण व महार ही होत. अशा प्रकारे वैदू जमात निर्माण झाली असे सांगितले जाते.

या जमातीची भाषा द्राविडियन आहे. शिवाय हे लोक मारूती व शंकराचे भक्त आहेत. तसेच मातृदेवता या जमातीच्या आराध्य देवता आहेत. अंजनीदेवी ही हनुमानाची आई आहे. हनुमान हा द्राविडियन आहे. तसेच वैदू जमात वडार, कैकाडी, धनगर यांना आपले भाऊ मानते. या सर्व गोष्टींच्या आधारे वैदू जमात ही आदिम जमात आहे हे सिध्द होते, कैकाडी ही जमात एक आदिम जमात आहे असे डॉ. रा.चीं. ढेरे व तारा भावळकर यांनी आपल्या ' महामाया ' या पुस्तकातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. दक्षिण भारतात आज असलेल्या ' तामीळनाडू ' येथील कुरूची या डोंगरी प्रदेशांमध्ये ' कुरव " अथवा ' कोरवा ' या नांवाने ओळखल्या जाणा-या जमातीचे लोक रहात होते[5]. ही जमात जशी शिकार करून व जंगलातून फळे व कंदमुळे गोळा करून जगत होती तसेच डोंगराच्या पायथ्याला असलेल्या डोंगर उतारावर डोंगराचा भाग जाळून त्यावर धान्य पेरून शेती पिकवित असे. एक वर्षाआड निरनिराळया डोंगर उताराच्या पट्टया जाळून शेती पिकविण्यासाठी उपयोगात आणल्या जात असत. अशा प्रकारच्या शेतीला कुंभर पध्दत किंवा 'शिफिटंग कल्टिव्हेशन' असे म्हणतात. ही कुरव जमात ही जंगलातील उत्पन्नावर तसेच शिकार करून व वरील प्रकारे कुंभर पध्दतीची शेती करून जंगलातूनच राहून आपली उपजीविका करीत होती. म्हणून या जमातीस शिफिटंग कल्टिव्हेटर्स ट्राईब्ज असे म्हटले आहे.[6] नंतरच्या काळात या प्रदेशात शेतीच्या क्षेत्रात प्रगत झालेली जमात आली असावी. ती आक्रमक असल्यामुळे मूळच्या ' कुरव ' जमातीस तिला विरोध करता आला नाही. नवीन आलेल्या जमातीने कुरवांच्या आयत्या शेतीसाठी पिकाऊ असलेल्या जमीनी काढून घेतल्या. व या विभागात स्वत:चे स्वामित्व प्रस्थापित केले. डोंगराच्या पायथ्याला तयार केलेली पिकाऊ जमीन व डोंगरांची मालकी बळकाविल्यामुळे कुरूत्री व तत्सम जमाती विस्थापित झाल्या. त्यामुळे या जमातींना भटकण्याशिवाय पर्याय राहिला नाही. या जमाती अन्नासाठी भटकत आंध्र, कर्नाटक या प्रांतातून महाराष्ट्रात आलेल्या आहेत. महाराष्ट्रात व संपूर्ण भारतात पसरलेली ' कोरवा ' ही जमात म्हणजे महाराष्ट्रातील आजची 'कैकाडी' ही जमात होय.[7] वैदू ही जमात कैकाडी या जमातीस आपल्यातील एक जमात समजते. तसेच वैदू जमातीस कर्नाटकामध्ये ' गोल्ला ' म्हणून ओळखले जाते. ही जमात मेंढपाळी करणारी भटकी जमात आहे.[8] या जमातीचे वसतीस्थान मद्रास आणि आंध्रप्रदेश आहे. गोल्ला ही जमात म्हणजेच महाराष्ट्रात तेलगु भाषा बोलणारी व भटकंतीचे जीवन जगणारी वैदू जमात आहे असे म्हणता येते.


प्राचीन काळी भारतीय वाङमयात कुरव जमातीचे उल्लेख सापडतात. ' पद्मावती परिणय ' कथेमध्ये महात्यकार वेंकटाचल पर्वतावर कुरव या किरात श्रेणीतील जमातींची वस्ती असल्याचे आपल्या पुराणांमधून सांगताना दिसतात. तसेच वेंकटाचल पर्वतावर निषाद्, किरात, शबर या जमातीचे लोक अरण्यातून मधाची पोळी शोधून मध गोळा करत, शिकार करीत व फावल्या वेळात राळयाची तसेच साळीची शेते पिकवून त्यावर उपजीविका करीत असत. हेच उल्लेख ' पद्मावती परिणय ' कथेत महात्यकारांनी केलेले आहेत. हे उल्लेख कुरव जमातींच्या प्राचीन जीवन सरणीला तंतोतंत लागू पडतात. अशाच प्रकारचे उल्लेख अळवार हे तामीळ वैष्णव संत आपल्या गीतांमधून करताना दिसतात. वेंकटाचल व तिरुवेंगडम् येथील क्षेत्रात राहणारे कुरव लोक शिकार करीत व माजलेल्या हत्तीना पकडीत आणि फावल्या वेळात ' तिनै ' नावाच्या भरड धान्याची शेती करीत असत[9]. वैदू समाजाचे पारंपारिक जीवन पाहता असे दिसते की हे लोक शिकार करण्यात तरबेज आहेत. जंगलातील सर्व झाडांची त्यांना ओळख आहे. मधाची पोळी काढण्यात हे लोक हुषार आहेत व दक्षिणेतील तिरूपतीचा बालाजी हे त्यांचे प्रमुख दैवत आहे. या सर्व गोष्टी कुरव जमातीशी जुळणा-या आहेत. म्हणूनच वैदु ही जमात फार प्राचीन काळापासून आजच्या तामीळनाडू, आंध्र आणि कर्नाटक या प्रांतातून महाराष्ट्रांत आली असे म्हणता येते.

( आ ) <u>लोकसंख्या</u> ... महाराष्ट्रामध्ये रहाणा-या वैदूंची लोकसंख्या अंदाजे 16,000 आहे असे या जमातीतील एक कार्यकर्ते उत्तम शिर्के यांच्या मुलाखातीवरून कळून येते. यामध्ये सातारमध्ये रहाणारे वैदू हे सर्वात प्रगत आहेत. महाराष्ट्रामध्ये गांववार त्यांची लोकसंख्या पुढीलप्रमाणे आढळते.

सातारा .. 500, अंबड .. 1500, जालना .. 50, बोंदलापूर .. 150, पैठण .. 150, औरंगाबाद .. 50, सोलापूर .. 1500, शिर्डी .. 800, साकोरी .. 700, रहाते .. 500, देगांव .. 400, वैजापूर .. 200, शेडबाळ .. 200, उगार .. 300, पनवेल .. 100, बोईवडा .. 50, कुर्ला .. 50, हडपसर .. 2000, चतुश्रृंगी .. 2000, नारायणगांव .. 400, अहमदनगर .: 500, अमरावती .. 250, चडचण.. 200, सिध्दापूर .. 200, लोणंद .. 40, इस्लामपूर .. 100, गोरेगांव .. 100, कांदिवली .. 100, दौंड .. 200, काष्टी.. 200, केडगांव .. 200

वैदू ही जमात भटकी असल्याने त्यांची नक्की संख्या शिरगणती अधिका-यांना मिळालेली दिसत नाही.

नकाशा क्र. ४




वैदूंची वसतीस्थाने

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR LIBRARY

( इ ) **वैदूंची बोलीभाषा** ... वैदूंची बोलीभाषा तेलगू आहे हे त्यांच्या वसतीस्थानावरून ( हैद्राबाद तेलंगण ) सिध्द होते. या भाषेला लिपी आहे. पण वैदूंना आता ती येत नाही. श्रीमती मुक्ताबाई दुर्गाप्पा वरगंटे यांच्या सांगण्यावरून पूर्वी वैदू लोकांना तेलगु लिपी अवगत होती. आपल्या औषधाचे ज्ञान पुढच्या पिढीस मिळावे म्हणून हे लोक ताडपत्रावर लिहून ठेवत. काळाच्या ओघात ही ताडपत्रे नष्ट झाली आहेत. पण या लोकांना लिखाण कला अवगत होती हे यावरून सिध्द होते. वैदू लोक ' धूळपाटीवर ' आपल्या सदस्यांना शिकवीत. यासाठी त्यांच्या पूर्वी शाळा असत. भटकत असताना कालांतराने या गोष्टी बंद पडल्या व त्यानंतर वैदू निरक्षर बनले. काही लोक कानडीची एक पोटभाषा बोलतात. तिला ते ' गोलारी '/ गोलायाव म्हणतात.[10]

( ई ) **वैदू व पोटजाती** ... वैदूंच्यामध्ये भोई, धनगर, कोळी, माळी, आणि फुलमाळी इ. निरनिराळया जातीचे लोक दाखल झाले आहेत अशी एन्थोवेन आर इ यांनी नोंद केली आहे[11]. मूळच्या धनगर जमातीतून निघालेल्या या जातीत नंतरच्या काळात आणि विशेषतः मराठी मुलखात आल्यानंतर इतर जातीचे लोक दाखल झाले असावेत आणि आजची वैदू जात तयार झाल्याचे आढळते.[12].

वैदूंमध्ये तीन प्रमुख अंतर्विवाही गट आढळतात[13]

अ. झोळीवाले ब. दाढीवाले क. चटईवाले

दाढीवाले वैदूंच्यामध्ये पुन्हा दहा उपजाती आढळतात. या जातीत रोटीव्यवहार चालतो पण बेटीव्यवहार होत नाहीत[14].

ए. भोई बी. धनगर सी. खुटेकर डी. कोळी इ. माळी एफ. मिरजु माळी जी. फुल माळी एच. रावळ आय. वागमुडी जे. झिंगा.

झोळीवाले वैदू झोळी वापरतात. दाढीवाले वैदू दाढी ठेवतात. आणि चटईवाले वैदू चटया विकतात.[15] मिरज, धारवाड व शिरसीमध्ये या लोकांना गोलस् गंडगिरस् आणि पंडीत म्हणून ओळखले जाते.[16]

जाती आणि जमाती या पुस्तकामध्ये वैदूंच्या पुढील चार पोटजातींची नोंद आढळते.[17]

अ. दासर वैदू ब. नंदीबैलवाले वैदू क. मंदयोड वैदू ड. नंदलोड वैदू.

प्रत्येक पोटजातीचे वेगळे व्यवसाय असून प्रत्येक जात स्वतःला दुस-यापेक्षा श्रेष्ठ समजते. त्यांच्यामध्ये रोटी बेटी व्यवहार होत नाहीत. मराठी ज्ञानकोशातही त्यांच्यात अनेक पोट जाती असल्याची नोंद आढळते.

एकंदरित पूर्वी वनौषधी घेऊन फिरणा-या लोकांच्या वर्गातून एक वेगळी जात निर्माण झाली असावी असे त्यांच्या उपजातीचे स्वरूप व त्यांची आडनांवे पाहून सिध्द होते. मढी, माळेगांव, औरंगाबाद, अंबड या गावच्या वैदूंच्या माहितीनुसार वैदूंच्यामध्ये झोळीवाले व संचीवाले अशी दोन प्रमुख पोटजाती असून झोळीवाले वैदू औषध विक्रीचा व्यवसाय करतात आणि संचीवाले वैदू डबे, चाळण्या तयार करण्याचा व्यवसाय करतात.

( उ ) **<u>वैदूंच्या कुळी / गोत्र / आडनांवे</u>** ... झोळीवाले वैदू हे मराठा वैदू म्हणूनही ओळखतात[18]. त्यांच्यामधील बहिर्विवाही गट हे आडनांवावरून ओळखले जातात. त्यांच्यामध्ये अंबिले, चितकळ, कोल्यांटी, मनपटी, मेटकळ, फरकंटी, शिंगाडे, मोरे, शितोळे, पवार, जाधव आणि शिंदे ही आडनांवे आढळतात[19]. दाढीवाल्यांच्या मध्ये माळी, पवार, कोळी, परीट, अंबिले, चितकळ, मटकळ, शिंगाडी, मनपटी, चंचीवाले अशी आडनांवे आढळतात[20]. तर संचीवाले वैदूंमध्ये खालील प्रमुख कुळी व उपकुळी आढळतात.[21]

संचिवाले वैदू

गुडेर (शिरूर लोड) (राजाराम) — राजाराम, वर्गिनटोड, दासरापोळ

शेवाळे (कर्नाटक गाडे) शिंदे — कर्नाट गोड, शिरकुळ, शिरूर लोड

गुडे कुळी व शेवाळे कुळी यांच्यातील तीन/तीन कुळीत आपापसात बेटीव्यवहार होत नाहीत. कारण त्यांच्यात भावकी एकच मानली जाते. समान आडनांवांच्या लोकांमध्ये विवाह होत नाही. संचीवाले व झोळीवाले वैदू परस्परांना वेगळे समजतात. महाराष्ट्रातील वैदूंनी स्वतःसाठी काळे, घोरपडे, चव्हाण ही आडनांवे स्वीकारली आहेत. माळेगांवच्या वैदूंमध्ये काळे, चव्हाण, धनगर, पवार, शिंदे, लोंखडे, फुलमाळी, कोळी, मसु, घोरपडे, वाघमुडे इ. आडनांवे स्वीकारली असून ती त्यांच्या उपजातींचीच आडनांवे आहेत. सध्या एक आडनांव सोडून इतर आडनांवाच्यामध्ये बेटीव्यवहार होतो.

देवक ... देवकाच्या बाबतीत वेगवेगळी मते आहेत. कांहींच्या मते झोळीवाल्यांना देवक नाही.[22] कांहींच्या मते प्रत्येक विभागाची वेगवेगळी देवके आहेत. समान देवक असणा-यामध्ये विवाह होत नाही. परंतु देवकासंबंधी मिळालेल्या माहितीतून ज्यांनी मराठा आडनांवे

स्वीकारली आहेत त्यांच्यात देवक प्रथा असल्याचे आढळते. वस्तुस्थितीवरून अशी देवके आढळतात. उदा. जाधवांचे पाचपालवी, मोरे आणि शितोळे यांचे कु-हाड इ.[23]

महाराष्ट्रात आल्यानंतर वैदूंनी कालीमाता, शंकर, म्हसोबा, खंडोबा, कानिफनाथ, यल्लमा या देवतांना कुलदैवत म्हणून स्वीकारले आहे. या समाजात कुळांना आणि गोत्रांना अतिशय महत्वाचे स्थान असून लग्न, मयत, अथवा महत्वाच्या प्रसंगी व्यक्तीचे कूळ व गोत्र पाहिले जाते. या समाजातील काही गोत्रांची नांवे माशोळ, वाडपुलोर, शंकोटोड, कठोड आणि आम्मोच्छोड अशी आहेत.[24]. वरील गोत्रावरून वैदूंच्या घराण्याची किंवा आडनांवाची वर्गवारी केलेली आहे. 'माशोळ' या गोत्रामध्ये धनगर, जाधव, शिंदे ही आडनांवे आढळतात. ' शांकोटोड ' या गोत्रात लोखंडे, पवार ही आडनांवे आढळतात. ' काठोड ' या गोत्रामध्ये ' लाकडे ' आणि ' आम्मोच्छोड ' या गोत्रामध्ये ' आंब्रे ' ही प्रमुख आडनांवे आहेत.

( ऊ ) **<u>वैदूंच्या जात विशिष्ट झोळया</u>** ... वैदूंची झोळी किंवा संची विशिष्ट प्रकारची असते. बारीक कमी अंतरावर दो-याच्या टीपा मारून शिवलेल्या गोधडयांच्या झोळया तयार होतात. संची देखील गोधडयांची बनविलेली असून त्याला वर अशा रितीने गाठ मारलेली असते की वर चारही कोपरे मोकळे दिसावेत. ही संची बांधल्यांनतर कांद्यासारखी दिसते. प्रत्येक उपजातीच्या वैदू स्त्रीयांनी विशिष्ट प्रकारची झोळी / संची बाळगावी असा संकेत असतो.[25] म्हणजे झोळीवाले झोळी खांद्यावर घेतात. तर संचीवाले ती डोक्यावर घेतात. झोळीचा आकार, ती तयार करण्याची पध्दती, वापरण्याची पध्दती यावरून वैदूंची उपजात ओळखता येते.[26] डोक्यावर संची घेणारे वैदू ' राजवैद्य ' म्हणून ओळखले जातात. तर खांद्यावर झोळी घेणारे वैदू ' धनगर वैदू ' म्हणून ओळखले जातात. संचिवाल्यांना चांभार मांग यांच्या हातचे पाणी पिल्यास दंड होतो. मात्र झोळीवाल्या वैदूंना त्यांच्या हातचे पाणी चालते[27].

( ए ) **<u>वैदूंचे राहणीमान, पोषाख, अन्नपदार्थ इ.</u>** ... वैदू लोक काळया वर्णाचे व मजबूत असतात. पाहुणचार करण्यात वाकबगार असलेले दिसतात. त्यांची रहाणी गलिच्छ असते. ते कष्टाळू आहेत. पुरूष लोक पांढरे धोतर लुंगीसारखे गुंडाळतात. डोक्याला मुंडासे बांधतात. आणि मिशा व दाढी ठेवतात पण डोक्याचे मुंडण करतात.[28] तर स्त्रिया पांढरी साडी ( धोतर ) नेसतात आणि पांढरीच चोळी घालतात. लग्न झालेल्या स्त्रिने कुंकू लावणे, मंगळसूत्र व जोडवी घालणे जरूरीचे असते. हे द्रविडीयन संस्कृतीशी जुळत असल्याने वैदू हे द्रविड संस्कृतीचे आहेत हे दिसून येते.

साधारणपणे हे लोक शहराच्या किंवा गांवाच्या बाहेर कापडी तंबू अथवा पालामध्ये रहातात[29]. हे सामान ते गाढवावर लादून आणत असतात. वैदू हे आदिम असल्याने त्यांना गावाबाहेर भौतिक दृष्टया प्रतिकूल परिस्थितीत रहाणे आवडते.

हे लोक मांसभक्षक व कट्टे दारूबाज असतात. ते भीक मागतात. ते धान्य व शिजवलेले अन्न दोन्ही भीक म्हणून स्वीकारतात. ते मिळेल त्या प्राण्याचे मास - बेडूक, उंदीर आणि साप सुध्दा खातात. त्यांचे रोजचे जेवण म्हणजे भाकर व भाजी. ही मागून आणली जाते.[30]

( ऐ ) **वैदूंचे व्यवसाय** ... क. वैदूंच्या सर्व पोटजाती या दक्षिण महाराष्ट्र ( दख्खान ) व कोकण भागामध्ये वर्षभर औषध विक्री करीत फिरत असतात. साध्या खोकल्यापासून डोकेदुखी ते जलोदर क्षयरोग इ. रोगांवर औषध देतात.[31] तुंबडी अथवा जळवा लावून अशुध्द रक्त शोषून घेतात. याशिवाय अनेक खनिज औषधी धातूपासून तयार केलेली औषधे आणि विष देतात. हे लोक शहरात अथवा खेडयात जाऊन रस्त्यावर अथवा गल्ल्यामध्ये फिरून औषधे देतात. ही औषधे एक दोन झोळयामध्ये ठेऊन देतात. या झोळयांची दोन टोके बांबूच्या दोन टोकांना किंवा एका टोकाला बांधून ती काठी खांद्यावर घेतात. या पिशव्यांमध्ये पालीची कातडी, वाघनखे, साळीचे काटे, सरडयाचे कातडे, अस्वलाचे केस, दात, कोल्हयाचे डोके इ. वस्तू असतात. रस्त्यातून जाताना हे लोक नाडी परीक्षा वैद ( नाडीचे ठोके तपासणे ) मंडूर वैद ( औषध विकणारे वैदू ) गरमी वैद (उष्णतेचे रोग दूर करणारे वैदू ) वाईला ओखद ( वातनाशक ) सर्दीला ओखद ( थंडीवर औषध ) अशा आरोळया देत जातात.[32]

वैदू लोक नाडी पाहून रोगाची परीक्षा करतात. आणि शरीरातील वात, पित्त, कफ आणि उष्णता यांचे प्रमाण सांगतात. यासाठी ते वातम, पित्तम, उष्णम, श्लेषम, कारकम, मेघम, सैत्यम इ. शद्ब वापरतात[33]. काही सनातनी लोक यांच्याकडून प्रत्यक्ष नाडी तपासून घेत नाहीत. त्यासाठी ते रोग्याच्या मनगटावर रेशमी वस्त्र टाकतात. पुरूषांची उजव्या हाताची व स्त्रिच्या डाव्या हाताची नाडी तपासतात. कांही वैद्य नाडी तपासण्याआधी हाताची बोटे व मनगटावरील सांधे मोडतात. कांही वैद्य सर्वसाधारणपणे मूळव्याध, कावीळ, गरमी, संधीवात इ. रोगांवर औषधे देतात. ही औषधे ग्रामीण औषधालयातून मिळवितात. याशिवाय चूर्ण, गोळया, भस्मे, मात्रा वापरतात. मात्रा विशिष्ट रोगांसाठी असून त्या मध किंवा तुपातून चाटावयास देतात.[34] औषधोपचार चालू असताना रोग्याला पथ्ये पाळावयास सांगतात. ' बिनमिठाचा भात ', लंघन करणे, कावीळ झाल्यास दही पिणे इ. महत्वाची पथ्ये पाळावयास सांगतात.[35] या औषधांच्या पिशव्या भगव्या रंगाच्या असतात.

ख..स्त्रियांचे व्यवसाय ... चटईवाल्या वैदू स्त्रिया चटया विणतात. दाढीवाल्या वैदू स्त्रिया काचमणी, शिंपले दळून त्यांची पावडर रांगोळी म्हणून विकतात.[36] वैदू लोक डबे, चाळण्या तयार करणे, दुरूस्ती करणे, मणी पोत, दाभण, बिब्बे, वाळे, मनगटी इ. वस्तु अन्न, कपडे, वस्तु, यांच्या मोबदल्यात विकतात. ज्या प्राण्यांच्या शरीरात औषधी भाग आहे त्यांची शिकार करतात.

वैदूंना श्रमिक म्हणून काम करण्यास परवानगी नाही. जर एकाद्या वैदूने पैसे घेऊन काम केले तर त्याला जातीच्या बाहेर काढले जाते आणि त्याने सर्व जमातीस जेवण दिल्यानंतर त्याला परत जातीत घेतले जाते.[37] थोडीशी जमीन त्यांच्या मालकीची असून ते शेती करतात.

ग. बावन्न पत्त्यांचा एक पत्ता .. वैदू लोक वात, गर्भपात यावर औषध देतात. सर्व झाडांची पाने एकत्रित ओरबाडून ती समप्रमाणात घेऊन, वाळवून, कुटून त्यांच्या गोळया तयार करावयाच्या व औषध म्हणून विकावयाच्या यास ' बावन पत्त्यांचा एक पत्ता ' म्हणतात.[38]

घ. तुंबडी लावणे ... तुंबडी हे लहान नळीच्या आकाराचे यंत्र असून त्याची एक बाजू उघडी व एका बाजूस बारीक छिद्र असते. कातडीवर एक जखम करून त्यावर मोकळी बाजू ठेवतात. छिद्राची बाजू वर करून त्यातून तोंडाने वायू ओढून घेऊन छिद्र बंद केले जाते. यामुळे अशुध्द रक्त, जीवाणु, खेचून घेतले जातात.

च. शिकार ... जंगलातील तरस, साप, ससे, घोरपडी, माकडे, उंदीर, घुशी, बेडूक, रानमांजरे, साळींदर अशा प्राण्यांची शिकार करणे, मगरीची शिकार करणे, कासवाची शिकार करणे, नाग पकडून त्याचे खेळ दाखविणे इ. व्यवसायही करतात.

( ओ ) **सामाजिक - सांस्कृतिक जीवन** ...

ए. जन्म बारसे .. पाचवीची प्रथा ... वैदूंमध्ये बाळाच्या जन्मानंतर नऊ दिवस विटाळ पाळतात. या काळात तिला तिच्या घरात ठेवले जात नाही.[39] मुलाचा जन्म झाल्या दिवशी हे लोक सामान्यपणे वर्तन करतात. आनंद व्यक्त करीत नाहीत. वैदू स्त्रिया बाळाच्या जन्मानंतर 5 व्या दिवशी पाचवी साजरी करतात. या दिवशी कपडे धुतात. सगळया स्त्रियांना बोलावून त्यांच्या ओटया भरतात. काही वेळा 5 वीच्या दिवशी बारसे करतात. मुलाला सुपात ठेवून बारसे करतात. 2/3 वर्षानंतर जावळ काढतात. त्यासाठी मामा असणे आवश्यक नसते. या विधीस ' जावळ फेडणे ' असे म्हणतात.[40] जावळ काढताना ज्या देवतेचा नवस केला असेल त्याचे नवस फेडतात. वैदूंमध्ये कान टोचण्याची प्रथा आहे. झोरेवाल्यांकडून (चंदनवाले) कान टोचून घेतात.

35

बाळाच्या जन्मानंतर 7 व्या दिवशी बाळाच्या पोटाला सुई तापवून डाग देण्याची पध्दत आहे. मिळेल ते शिळे पाके अन्न खात असल्याने पोटदुखीचा विकार होऊ नये म्हणून ही प्रथा आहे.

बी. लग्न पध्दती ... झोळीवाल्या वैदूंमध्ये कुणबी आणि धनगर या जातीच्या सदस्यांना प्रवेश दिला जातो. यावेळी पंचांच्या समोर नवागताला औषधांची पिशवी दिली जाते. तिची पूजा केली ,जाते. व त्यांचे औषधाचे तंत्र त्याला शिकविले जाते. यानंतर नवागताकडून जमातीला जेवण देऊन जमात प्रवेश दिला जातो.[41]

अ. बालविवाहाची प्रथा ... या जमातीत बालविवाह ठरविले जातात. गरोदर स्त्रीच्या पोटाला कुंकू लावून विवाह ठरवितात. साटेलोटे विवाह पध्दत रूढ आहे.[42] पण भावा बहिणींच्यामध्ये उच्च नीच असा कुळीचा फरक असेल तर त्यांच्या मुलांचा विवाह मान्य केला जात नाही.[43]

ब. या समाजात बहुपत्नीत्वाची प्रथा आहे पण बहुपतीत्व मान्य नाही.[44] वैदू पुरूष कुवत नसताना केवळ जमातीची प्रथा म्हणून 2/3 बायका करतात.

क. पुनर्विवाह प्रथा .. या जमातीत पुनर्विवाह केला जातो. विधवा पुनर्विवाह करताना तिच्या मृत पतीच्या नातेवाईकाशी विवाह करू शकत नाही. हा विवाह संध्याकाळी केला जातो. फक्त भाद्रपद महिन्यात विवाह केले जात नाहीत.[45] यावेळी वर वधुंना जवळ बसवून अगोदर विधवेच्या कपाळावर कुंकू लावले जाते. नंतर एका विधवेकडून तिला पदर घातला जातो. वर वधुंच्या कपडयांची गाठ मारली जाते. नंतर एकमेकांचे नांव उच्चारून हा विवाह होतो. यांनंतर नवीन जोडप्यास तीन दिवस अज्ञात जागी लपून बसावे लागते. चौथ्या दिवशी हे जोडपे जातभाईंना जेवण देतात. दारू पाजतात. अशा विवाहास ' उडकी ', ' पाट लावणे ', किंवा ' म्होतुर ' म्हटले जाते.,[46] पुनर्विवाहित स्त्रिस समाजात मान नसतो. तिला देवकार्य, उपास तापास इ.मध्ये भाग घेऊ देत नाहीत. लग्नकार्यात मान पान होत नाहीत.

ड. लग्न पध्दती ... मुलींची लग्ने वयात आल्यानंतर केली जातात. मुलांचे वय सोळा असते. लग्नाअगोदर लैंगिक संबंध मान्य केले जात नाहीत. जर एखाद्या मुलीने असे संबंध जाती मधील मुलाबरोबर किंवा उच्च जातीतील मुलाबरोबर ठेवले तर आणि त्यांनी दंड भरला व संपूर्ण जमातीला जेवण दिले तर तो संबंध मान्य केले जातात.[47] कांहींच्या बाबतीत अशा लोकांच्या जिभेला सोन्याची तार गरम करून चटका दिला जातो. चिंचेच्या फोकेने मारले जाते. तर

... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

पुरुषाला गरम, उकळत्या पाण्याने अथवा तांब्याचा पैसा गरम करून भाजले जाते.[48] दाढीवाले वैदूंच्या मध्ये अशा प्रकारचा संबंध ठेवणारा मनुष्य जर हीन कुळातील असेल तर त्याला दोषी ठरवितात व त्याचे लग्न अपवित्र अशा स्त्रिशीच करण्याची त्याच्यावर सक्ती केली जाते.[49] पुरुषाने जर महार मांग अशा अस्पृश्य समाजातील स्त्रिशी संबंध ठेवले तर त्याला जातीबाहेर काढले जाते.

लग्नाची मागणी मुलाचे वडील घालतात. मुलीच्या वडीलांना पंधरा रुपये देज/वधुमूल्य द्यावे लागते.[50] हे लोक अंधश्रध्दाळू असल्यामुळे लग्नासाठी मुहूर्त शोधण्यास ते ब्राम्हणास बोलवितात. किंवा गाव ज्योतिषी बोलवितात. संपूर्ण कार्यक्रम जमातीतील वडिलधारे लोक किंवा न्हावी पार पाडतात. मात्र मराठा उपजातींमध्ये ब्राम्हण व धनगर वैदू किंवा तेलगु भाषिकामध्ये धोब्याला आणले जाते.[51] वेगवेगळया जमाती व पोटजातींमध्ये लग्न विधीमध्ये थोडासा फरक दिसतो. एकंदरित सर्व जमातीमध्ये पुढील पध्दत दिसून येते.

प्रथम नवरा व नवरी यांना आपापल्या घरी हळद व तेल लावले जाते. नंतर मुलाला मुलीच्या घरी मिरवणुकीने नेले जाते. जमीनीवर कापड अंथरून त्यावर गव्हाचा चौक भरून मुलाला त्यावर बसविले जाते. नंतर मुलीला त्याच्या डाव्या बाजूस बसविले जाते. नंतर वधुकडील दोन व वराकडील तीन अशा पाच सवाशिणी त्या दोघांच्या कपाळावर गाईच्या शेणाची राख किंवा भस्म लावतात. त्यादिवशी जेवण दिले जाते. दुस-या दिवशी मंगळसूत्र किंवा गळसोरी मुलीच्या गळयाभोवती बांधली जाते. यानंतर मुलाच्या उजव्या मनगटास व मुलीच्या डाव्या मनगटास विवाहाचे कंकण बांधले जाते.[52] कंकण बांधण्याचे काम न्हावी करतो. यानंतर दोघांचे कपडयांची गाठ मारली जाते. वर वधु एकमेकांच्या नांवांचा उच्चार करतात आणि दोघांना मुलांच्या घरी नेले जाते. तेथे ही गाठ सोडून विवाह विधी संपविला जातो. कंकण बांधणे हा महत्वाचा विधी मानतात. हैद्राबादमधील जमातीत नंतर सामिल झालेल्या मराठा वैदूंमध्ये एका थाळीत देवक ठेवून मारुतीच्या मंदिरात नेऊन मूर्तीपुढे ठेवतात. तेथून ते नवीन दांपत्याच्या घरात आणून देवापुढे त्याची स्थापना करतात. लग्नाच्या वेळी स्त्रिया तेलगु गाणी म्हणतात. लग्नसोहळा चालू असताना लोकरंजनासाठी निरनिराळी सोंगे घेऊन जमातीतील लोक नाच करतात.

या जमातीत अलिकडे समूह विवाह होतात. 15 ते 20 लग्ने एकत्र केली जातात. करमाड जवळ पोहेगांवात 52 लग्ने एकत्र झाल्याचे शंकर बाबू चव्हाण या गृहस्थाने सांगितले आहे. एकदा मुलीचे लग्न निश्चित झाले की ते मोडण्यास परवानगी नसते. लग्न मोडले तर मुलीच्या बापास दंड करतात. ज्याच्याकडे जास्त कुत्री असतात असा वैदू श्रीमंत मानला जातो. जो जास्त

कुत्र्यांचा सांभाळ करेल तो मुलीला चांगले सांभाळेल अशी त्यांची खात्री असते. नोकरी व उत्तम रहाणीमान असणा-या पण कुत्री नसणा-या वैदूला मुलगी देण्याचे टाळले जाते.[53]

इ. कोहिनूर काप ... लग्नाच्या वेळी टिळा लावण्याच्या प्रथेस ' कोहिनूर काप' असे म्हटले जाते.[54] यासाठी पूर्वी जातपंचायतीस ।। रू. देत. समाजाला बोकडाच्या मटणाचे जेवण देतात. लग्नकार्यात दारू पिण्यास महत्व असते. लग्नामध्ये किंवा लग्नानंतर पानसुपारीच्या कार्यक्रमात मान पान केले जाते.. जातीचे सगळे लोक भोवताली बसून मध्ये घोंगडी व त्यावर ज्वारीची लहानशी रास ठेवून मानक-यांना एकानंतर एक बोलावून मानाचे पान देतात. हा मान एक पान, अर्धा पान, पाव पान, किंवा पानाचा एक लहान तुकडा असे निरनिराळे असतात. मानपानावरून लग्नांत भांडणे होतात. हे मान पुढीलप्रमाणे .....

ए. कोहिनूर काप (राजा) बी. पेदान सी. गाडी पेदान डी. कर्नाट गोड
इ. वर्गिनी वडे पान एफ. दासरा पोळ जी. शदुर लोडु एच. रोरके लोडु
आय. पिंडर लोडु जे. इराक लोडु के. कांचुर वोडु एल. बंतल वोडु
एम. वाटयाळ एन. राजेराम कुलुम ओ. परपुरी (प्रधान) पी. भंगेडु
क्यू. बिंदेडु इ..

( औ ) **वैदूंचे धार्मिक जीवन** ... क. ही जमात हिंदु वारसा कायद्याचे पालन करताना दिसते आणि हिंदु धर्माशी संबंधित अशी आहे.[55] ते सर्व ब्राम्हणी आणि खेडयातील देवांची पूजा करताना दिसतात. त्यांची भक्ती व्यंकोबा, मरिअम्मा आणि मारूतीवर जास्त आहे. यल्लम्मा व खंडोबा ही त्यांची दैवते आहेत. यल्लम्मा देवीसाठी ते मंगळवारी व व्यंकोबासाठी शनिवारी उपास करतात.[56] ते क्वचित यात्रेला जातात. ते दसरा आणि शिमग्याचा सण साजरा करतात. दस-याला ते बकरे देवाला अर्पण करतात आणि त्याचे मांस खातात.[57] रविवारी, मंगळवारी आणि शुक्रवारी बकरी किंवा कोंबडयाचा देवास बळी देतात. मुस्लीम संतांबद्दल त्यांना आदर आहे.[58] त्यांची चेटूक, चेटकीण, ज्योतिषी, शकुन, नशिब इ. गोष्टी वर श्रध्दा दिसते. देवाला ते कौल लावतात. दस-यानंतर खानदेश जिल्हयातील लोक सप्तशृंगी टेकडीवर जाऊन वनदेवतेला बकरे कापतात.[59] कारण तिथून त्यांना औषधी वनस्पती मिळतात. ते ब्राम्हणाकडून फक्त लग्नाचा मुहूर्त काढून घेतात व त्यांना नागवेलीची पाने व पाच तांब्याची नाणी देतात.[60] बाकीचा लग्नविधी न्हावी व इतर धार्मिक विधी जमातीतील वडीलधारे लोक करतात.

याशिवाय शंकर हे वैदूंचे उपास्य दैवत आढळते.[61] ते महाशिवरात्र साजरी करतात. त्यांच्या वस्तीत शंकराचे देऊळ आढळते. शंकराचा उपासही करतात. राजाराम

गोत्रांमध्ये शंकर, हनुमान, रामाची पूजा केली जाते. वर्गिनटोड यांची प्रमुख देवता येल्लम् (जगदंबा) आहे. देवीचा गोंधळ घालतात. वैदूंच्या प्रत्येक कुटुंबात देवदेवतांचे देव्हारे आढळतात. त्यांच्या देव्हा-यात पितळेचे व चांदीचे टाक असतात. जितके टाक तितके ते बळी देतात. महाराष्ट्रात आल्यानंतर शंकर, म्हसोबा, खंडोबा, कानिफनाथ, यल्लम्मा इ. देवतांचा कुलदेवता म्हणून त्यांनी स्वीकार केला. हा समाज अंधश्रध्दाळू आहे. हे त्यांच्या धार्मिक जीवनावरून सिध्द होते.

आषाढ महिन्यात मढी व जेजुरी येथे वैदूंच्या चार दिवस जत्रा भरतात. या जत्रेत नवस फेडले जातात व नवीन नवस केले जातात. तंटे सोडविणे, विवाह ठरविणे, इ. करतात. जत्रेच्या चारही दिवशी बायका मुले विटाळाचा काळ म्हणून डोक्यावरून आंघोळी करतात. शिवाशिव पाळतात. जत्रेसाठी कर्ज काढतात. बक-याच्या, रेडयाच्या बळीचा नवस करतात. अंकव्वा,ताय्म्मा या देवांना डुकराचा बळी देतात. नवसासाठी नारळ, लिंबे, उदबत्ती, खडीसाखर, पेढे , मिठाई, फुटाणे, गूळ, साखर, बत्तासे इ. चा वापर केला जातो.[62]

ख. पंजे बसविण्याची प्रथा ... वैदू समाज हिंदू धर्मियाप्रमाणे मुस्लीम देवांची काही श्रध्दास्थाने मानतो. मुस्लीम समाजातील पीर / पंजे हे लोक घरी बसवितात. मुस्लीमाप्रमाणे उपवास करून पंजाची मिरवणूक काढून मोठा सण साजरा करतात.

ग. मर्तिक प्रथा ... या जमातीत मृताचे दफन किंवा दहन केले जाते.[63] दाढीवाला वैदूंमध्ये प्रेत पुरले जाते. विवाहित मृतास बसलेल्या स्थितीत पुरले जाते. अविवाहित मृतास पाठीवर झोपवून पुरले जाते. प्रेत एका झोळीत ठेऊन ही झोळी बांबूच्या मध्ये अडकविली जाते. आणि दोन माणसांच्या खांद्यावरून ती स्मशानात नेली जाते. दहन करावयाचे प्रेत बांबूच्या तिरडीवरून नेले जाते. तिस-या दिवशी मृताच्या रक्षेचे पाण्यात विसर्जन केले जाते आणि दहनाच्या जागी मातीचे मडके पाणी भरून आणि शिजविलेला भात ठेवला जातो. अकराव्या दिवशी मृताच्या घरचे लोक जंगम आणि जातभाईबरोबर नदीवर जातात. मृताचा मुलगा नदीत उभा राहून एका सुपात तीन पिंडे घेतो. ते पाठीमागच्या बाजूस टाकतो व पाण्यात अंघोळ करतो. त्यानंतर जंगम शंख वाजवतो व मृतात्मा कैलासाला गेल्याची घोषणा करतात.[64] जंगमाला अकरा रूपये देऊन सर्वजण घरी जातात.. महिन्या दोन महिन्यानंतर जमातीस जेवण दिले जाते. ते श्राध्द अथवा इतर कोणत्याही प्रकारचा विधी मृतात्म्याच्या संदर्भात करत नाहीत. सर्वसाधारणपणे कुटुंबातील मृत व्यक्तीचे नांव बाळाला देण्याची प्रथा यांच्यात आहे.

( अं ) **वैदु स्त्रिचा दर्जा** .. क. पुरूषांच्या तुलनेत स्त्रिचे स्थान दुय्यम असते. वैदु स्त्रिस पातिव्रात्याचे कडक पालन करावे लागते. तिचा स्वैराचार मान्य केला जात नाही. अशा स्त्रिच्या जिभेवर सोन्याची तार गरम करून चटका देतात किंवा चिंचेच्या फोकेने मारतात.[65] स्त्रिस वस्तुविक्री करात असताना जर बाहेरगांवी मुक्काम केला तर तो कुंभाराच्या घरी करावा लागतो. कुंभार हा नवनिर्मिती करणारा असल्याने तो ईश्वरासमान पालक मानला जातो. तसेच कुंभार हा द्रविडीयन संस्कृतीचा असल्याने त्याला जवळचे मानले जात असावे. बालविवाह, पुनर्विवाह इ. पध्दती रूढ आहेत. स्त्रिला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य दिले जाते. शकुनावर विश्वास असल्याने अपशकुनी स्त्रिस ते मारून टाकतात. किंवा विकून टाकतात. एखाद्या मुलीच्या डोक्यात भोवरा असल्यास अशा स्त्रिचा पती मरतो अशी त्यांच्यात अंधश्रध्दा असते. दहन / दफन विधीत स्त्रिस प्रवेश नसतो.[66]

ख. घटस्फोट प्रथा ... या जमातीत नवरा बायकोस घटस्फोट देऊ शकतो. स्त्रिची वर्तणुक वाईट असेल, पतीशी तिचे पटत नसेल अथवा तिने एखादी रात्र जातभाईशिवाय इतराबरोबर काढली असेल तर तिला घटस्फोट दिला जातो. यासाठी पंचांची मान्यता लागते. स्त्रिचे वडील किंवा पालक पंचांना । ते 3 रुपयांपर्यंत दंड भरतात.[67] विधवा पुनर्विवाहाच्या पध्दताप्रमाणेच घटस्फोटित स्त्रिस पुनर्विवाह करता येतो.

( अः ) **जातपंचायतीचा प्रभाव** ... या जमातीवर जातपंचायतीचा प्रभाव आहे. जमातीचे प्रमुख पद हे हुषारी, वय, इ.वर अवलंबून असते. पंचायतीचया प्रमुखास ' नायगाड ' असे म्हणतात.[68] हे लोक आपले सामा. खटले अवघड प्रश्न धर्मगुरू किंवा जंगमापुढे सर्व पंचायतीसमोर मांडतात. त्यांचे निवासस्थान कर्नाटकात आहे.[69]

जाती अंतर्गत तंटे, अनैतिक संबंधाबाबतचे तंटे, लग्नाबद्दलचे निर्णय घेण्याचे अधिकार पंचायतीस असतात. लोक न्याय मागण्यास पंचायतीकडे जातात. ज्या व्यक्तीने गुन्हा केला असेल, त्याला वाळीत टाकले जाते किंवा एक पैशाचा दंड केला जातो. किंवा संबंधित व्यक्तीची गाढवावरून धिंड काढली जाते.

एखादी व्यक्ती जर गुन्हा कबूल करीत नसेल तर त्याला देवापुढे उभे केले जाते. त्याला आंघोळ घातली जाते. नंतर स्वच्छ केलेले मूठभर तांदूळ त्याच्या तोंडात ठेवले जातात. संबंधित व्यक्ती ते चघळते. नंतर त्याच्यासमोर पिंपळाचे पान ठेवले जाते. आणि त्या व्यक्तीस तोंडातील तांदूळ पानावर थुंकावयास सांगितले जाते. जर त्या व्यक्तीने गुन्हा केला असेल तर तांदळाबरोबर तोंडातून रक्त पडते असा समज त्यांच्यात आहे.

या समाजात जातपंचायतीचे नियम अलिखित आहेत. प्रथम स्थानिक ठिकाणी न्याय दिला जातो. हा न्याय मान्य नसेल तर जेजुरी येथे दर पौर्णिमेस गाढवांचा बाजार भरतो तेथे निकाल दिला जातो. तेथील निकाल मान्य नसेल तर ' रंगपंचमी ' ला ' कानिफनाथाच्या ' यात्रेत मढी येथे पुन्हा न्याय मागितला जातो. ' मढी ' हे सर्व भटक्या विमुक्तांचे सर्वोच्च न्यायालय मानले जाते.[70] मढी येथे दहा ते पंधरा दिवस यात्रा भरते. याठिकाणी सर्व जाती जमातींच्या जातपंचायती एकत्र येतात आणि न्याय देतात.

पुरूष गुन्हेगाराला माफी मागून किंवा दंड भरून पुन्हा जातीत घेतले जाते. अनैतिक कृत्य करणा-या स्त्रीस वाळीत टाकतात. माफी अथवा दंड या प्रकारची सूट तिला नसते.

बलात्कारी व्यक्तीच्या डोक्यावर चिलमीने डाग देतात. अर्धे क्षौर करून धिंड काढतात. काटयांवर उभे करतात किंवा डोक्यावर दगड ठेवण्याची शिक्षा देतात. एका ठिकाणी मुलीचे लग्न ठरवून जर ते मुलीच्या वडीलांनी मोडले तर अशा गुन्हयास 400 ते 500 रू. दंड केला जातो. जातीपंचायतीतील सर्वात कठोर शिक्षा म्हणजे ' वाळपत्र ' किंवा ' खोडपत्र देणे '.[71] काहीं गुन्हयात चुलीची राख पंचांकडून अपराध्याच्या जिभेस लावतात व प्रायश्चित्त घेतल्यानंतर त्याला पुन्हा जातीत घेतले जाते.

माळेगांवच्या लक्ष्मीआईच्या समोर अपराध्यास तांदूळ खावयास देतात. तो अपराधी असेल तर त्याच्या तोंडास कोरड पडते असे मानले जाते.

प्रमुख पंच .. निरनिराळया विभागातील पंच एकत्र येतात. त्यापैकी प्रमुख पंच पुढीलप्रमाणे ....

ए. रामायलु मुथाज .. अर्धापूर ( नांदेड )

बी. अण्णाप्पा गुरप्पा वरूड .. ( औरंगाबाद )

सी. यल्लप्पा शिंदे .. ( आकोट )

डी. सरकार शिंदे .. ( आकोट )

इ. रामा आमलकर .. ( निमगांव नांदुरा )

एफ. गोविंद अंभारे .. ( अकोला )

(अ) स्वातंत्र्योत्तर काळातील वैदूंची स्थिती ... स्वातंत्र्योत्तर काळांत काही वैदू शहरामध्ये स्थायिक झालेले आहेत. त्यांच्या लहान वस्त्यांना ' वैदुवाडी ' असे म्हणतात. या वस्त्यातून फक्त 5 ते 10% लोक रहातात. 90 ते 95% वैदू आजही भटकंती करतात. त्यामुळे यांच्यात शिक्षणाचा अभाव आढळतो. शहरातील वैदूंच्यात साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. परंपरागत

औषध्य विक्रीचा व्यवसाय सोडला आहे.

सामाजिक चळवळींचा त्यांच्यावर प्रभाव पडलेला दिसतो. हे लोक समाजकारण, राजकारणात काम करू लागलेले आहेत. या समाजात 99% आर्थिक सामाजिक मागासलेपण आहे. अंधश्रध्दा, रूढी परंपरावर विश्वास व देवभोळेपणा आजही त्यांच्यात दिसून येतो.

संचीवाले वैदू डुकरांच्या केसांचा धंदा करीत आहेत. डुकरे पाळणे, गाढवे पाळणे, गाढवे विकणे हे व्यवसाय सुरू झाले आहेत. वैदू समाजातील शिक्षीत लोकांनी ' महाराष्ट्र वैदू समाजसेवा संघ ' स्थापन केला आहे. मराठवाडयातील वैदूंनी ' मराठवाडा वैदु सभा ' नावाची संघटना स्थापन केली आहे. वैदू जमातीतील संचीवाले वैदू जास्त प्रमाणात जागृत झाले आहेत. महाराष्ट्र शासनाने वैदुंना भटक्या जाती जमातीत समाविष्ट करून विकासाची संधी उपलब्ध करून दिली आहे. प्रत्यक्षांत 95% टक्के समाज या सवलतींपासून आजही दूर आहे.

**********



12208

A

संदर्भ ...

1. एंथोवेन आर इ .. द ट्राईब्ज अँड कास्टस् ऑफ बॉंबे, खंड 3 पृ.क्र.406
2. कित्ता पृ.क्र. 406
3 कित्ता पृ.क्र. 406
4. कित्ता पृ.क्र. 406
5. पूंच स्टीफन .. द अॅबॉरोजिनल ट्राईब्ज ऑफ इंडिया, .. पृ.क्र. 243
6. कित्ता पृ.क्र. 32
7. ढेरे रा.चि., भवाळकर तारा .. महामाया .. पृ.क्र. 108
8. रसेल आर व्ही, हिरालाल राय बहादूर .. द ट्राईब्ज अॅन्ड कास्टस् ऑफ द सेंट्रल प्रोव्हियन्स ऑफ इंडिया .. खंड 3, पृ.क्र.35
9. ढेरे रा.चि., भवाळकर तारा .. उपरिनिर्दिष्ट पृ क्र. 108
10. पाटील पंढरीनाथ .. भटके भाईबंद .. पृ.क्र. 77
11. एंथोवेन आर ई .. उपरिनिर्दिष्ट खंड 3 पृ.क्र. 406
12. कित्ता पृ.क्र. 406
13. कित्ता पृ.क्र. 406
14. कित्ता पृ.क्र. 406
15. कित्ता पृ.क्र. 406
16. कित्ता पृ.क्र. 407
17. चव्हाण रामनाथ .. जाती आणि जमाती .. पृ.क्र. 85
18. एंथोवेन आर ई .. उपरिनिर्दिष्ट खंड 3 पृ.क्र. 407
19. कित्ता पृ.क्र. 407
20. कित्ता पृ.क्र. 407
21. कित्ता पृ.क्र. 407
22. कित्ता पृ.क्र. 407
23. कित्ता पृ.क्र. 407
24. चव्हाण रामनाथ .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 88
25. डॉ. मांडे प्रभाकर .. गावगाडयाबाहेर .. पृ.क्र. 140

26. कित्ता पृ.क्र. 140

27. कित्ता पृ.क्र. 140

28. गॅझेटियर ऑफ द बॉंबे प्रेसिडन्सी .. सातारा डिस्ट्रिक्ट खंड 19 पृ.क्र.128

29. एंथोवेन आर ई .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 407, खंड 3

30. गॅझेटियर ऑफ द बॉंबे प्रेसिडन्सी .. सातारा डिस्ट्रिक्ट, खंड 19 पृ क्र.128

31. एंथोवेन आर ई .. उपरिनिर्दिष्ट खंड 3 पृ.क्र. 407

32. कित्ता पृ.क्र. 407

33. थर्स्टन ई .. कास्ट्स् अँड ट्राईब्ज ऑफ सदर्न इंडिया ..
खंड 7, पृ.क्र. 267 - 270

34. कित्ता पृ.क्र. 267 - 270

35. कित्ता पृ.क्र. 267 - 270

36. एंथोवेन आर ई .. उपरिनिर्दिष्ट पृ क्र. 407

37. कित्ता पृ.क्र. 407

38. डॉ. मांडे प्रभाकर .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 146

39. गॅझेटियर ऑफ द बॉंबे प्रेसिडन्सी .. सातारा डिस्ट्रिक्ट
खंड 19, पृ.क्र. 128

40. डॉ. मांडे प्रभाकर .. उपरिनिर्दिष्ट पृ क्र. 142

41. एंथोवेन आर ई .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 408

42. डॉ. मांडे प्रभाकर .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 142

43. एंथोवेन आर ई .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 407

44. कित्ता पृ.क्र. 408

45. कित्ता पृ.क्र. 409

46. चव्हाण रामनाथ .. उपिरिनिर्दिष्ट पृ.क्र. 87

47. एंथोवेन आर ई .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 408

48. कित्ता पृ.क्र. 408

49. कित्ता पृ.क्र. 408

50. कित्ता पृ.क्र. 408

ठरते. समाजाच्या व्यापक हिताच्या दृष्टीकोनातून त्यांचे प्रश्न लवकरात लवकर सुटणे योग्य होईल.

भारतामध्ये इतर प्रांतापेक्षा महाराष्ट्रांत भटक्या जाती जमातींचे प्रमाण जास्त आहे. महाराष्ट्रांत एकूण 42 भटक्या विमुक्त जमाती आहेत. त्यापैकी 28 भटक्या व 14 विमुक्त आहेत. या 42 जमातींच्या पोटजातींची संख्या 200 पर्यंत आहे. त्यामध्ये संस्कृती, भाषा, व्यवसाय, भौगोलिक परिस्थिती यामध्ये वेगवेगळेपणा आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून 48 वर्षे होऊनही हे लोक अंधश्रध्दा, जुन्या अनिष्ट रूढी, परंपरा, चालीरीती, विवाह पध्दती, सण, उत्सव व राहणीमान यावर विश्वास ठेवतात. यामध्ये शिकार करून उपजीविका करणारे, जनावरे पाळून खरेदी विक्री करणारे, पारंपारिक कलेच्या आधारे लोकांचे मनोरंजन करून जगणारे, हस्तरेषा भविष्य सांगणारे, देवाच्या नांवावर भिक्षुकी करणारे, घरोघरी भिक्षा मागून जगणारे, धार्मिक विधी कार्य करणारे आणि कष्टाची कामे करून उपजीविका करणा-या भटक्या विमुक्त जमातींचा समावेश आहे. शतकानुशतके दुर्बल असणा-या, गुन्हेगार ठरलेल्या, शोषित व दुर्लक्षित अशा भटक्या विमुक्त जाती - जमातींची जीवनपध्दती बहुसंख्य जनतेला माहिती नाही. हा समाजही आता प्रस्थापित समाजाप्रमाणे जीवन जगण्यासाठी पुढे येऊ पहात आहे. जागृत होत आहे. त्यांच्यात परिवर्तन व्हावे म्हणून झटत आहे. अशा या ' आज इथं उद्या तिथं ' राहणा-या भटक्या उपेक्षितांची समाजाला माहिती होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने या जमातीतील एक जमात - वैदु जमात ' हिचा अभ्यास करण्याचा हा एक प्रयत्न आहे.

आ) **उद्देश** ...

वैदु समाज हा उपेक्षित व भटका असा आदिम आहे. या समाजातही रूढी, प्रथा, अंधश्रध्दा यांचे प्रमाण अजूनही जास्त आहे. या सर्व गोष्टीत बदल व्हावा म्हणून ही जमात प्रयत्न करीत आहे. त्यांची पारंपारिक जीवन पध्दती, संस्कृती, रूढी, परंपरा, चालीरीती, देवदेवता, उत्सव, सण, भाषा, पोशाख, व्यवसाय, कला, जात पंचायत यांची समाजाला माहिती झाली पाहिजे. त्यांचे प्रश्न, सामाजिक समस्या समाजाला समजल्या पाहिजेत, त्यांची सांस्कृतिक, आर्थिक स्थिती, त्यांची अभिवृत्ती यांच्यातील परिवर्तन अभ्यासणे गरजेचे आहे. हेच सर्व उद्देश ठेऊन या जमातीचा अभ्यास केला आहे. यादृष्टीने पुढील उद्देश डोळयासमोर ठेऊन हा अभ्यास केला आहे.

1. वैदु जमातीचे सामाजिक जीवन अभ्यासणे.
2. वैदु जमातीच्या धार्मिक प्रथा रीतीरिवाज अभ्यासणे.
3. वैदुंचा पारंपारिक व्यवसाय तपासणे.

51. कित्ता पृ.क्र. 408

52. कित्ता पृ.क्र. 408

53. पाटील पंढरीनाथ .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 82

54. डॉ. मांडे प्रभाकर .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 143

55. एंथोवेन आर ई .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 409

56. गॅझेटियर ऑफ द बॉंबे प्रेसिडन्सी .. सातारा डिस्ट्रिक्ट खंड 19, पृ.क्र.128

57. एंथोवेन आर ई .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 409

58. कित्ता पृ.क्र. 409

59. कित्ता पृ.क्र. 409

60. गॅझेटियर ऑफ द बॉंबे प्रेसिडन्सी .. सातारा डिस्ट्रिक्ट खंड 19, पृ.क्र. 128

61. पाटील पंढरीनाथ .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 86

62. माने लक्ष्मण .. पालावरचं जग .. पृ.क्र. 4

63. एंथोवेन आर ई .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 410

64. कित्ता पृ.क्र. 410

65. कित्ता पृ.क्र. 408

66. पाटील पंढरीनाथ .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 77

67. एंथोवेन आर ई .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 409

68. चव्हाण रामनाथ .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 88

69. गॅझेटियर ऑफ द बॉंबे प्रेसिडन्सी .. सातारा डिस्ट्रिक्ट खंड 19, पृ.क्र.128

70. चव्हाण रामनाथ .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 86

71. डॉ. मांडे प्रभाकर .. उपिरिनिर्दिष्ट पृ.क्र. 144


************